पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
● परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● Board of Examinations and Evaluation ●

परिपत्रक क्र:- 80

सर्व संलग्नित महाविदयालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या, संचालक/अध्यक्ष व मा.संचालक सर्व शैक्षणिक संकुले विदयापीठ प्रांगण यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, विदयापीठामधील परीक्षांचे निकाल विहित मर्यादेत घोषित करता यावेत व विदयार्थ्यांना येणाऱ्या समस्यांना टाळता याव्यात याचा विचार करता आक्टोबंर/नोव्हेंबर-२०२३ या सत्रामधील परीक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित होण्यासाठी येणाऱ्या अडचणी विचारात घेता खालील ठरावाची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी.

दिनांक २३/०१/२०१८ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ सभेतील ठराव क्र.७/२

ठराव :- विदयापीठीय परीक्षा उत्तरपत्रिका मूल्यमापन करण्याकरिता परीक्षक/नियामक म्हणून विविध महाविदयालयातील शिक्षकांना नियुक्ती आदेश वेळेत पारीत करण्यात येतात, तरी देखील पाच दिवसाच्या कालावधीत मध्यवर्ती मूल्यमापन केद्रावर मूल्यमापनासाठी उपस्थित राहत नाहीत. काही महाविदयालयातील शिक्षक मूल्यमापन करीत नाहीत, अशा महाविदयालयाचा निकाल राखून ठेवण्याचे व संबंधीत महाविदयालयाचे त्या पुढील परीक्षांचे उत्तरपत्रिका मूल्यमापनाकरीता न स्वीकारण्याचे सर्वानुमते ठरले.

सबब वरील ठराव विचारात घेता परीक्षेचे कामकाज प्राधान्याने पुर्ण करणे बंधनकारक असल्यामुळे आपल्या महाविदयालयातील सर्व शिक्षकांना उत्तरपत्रिकेच्या मूल्यमापनाचे काम सत्वर पुर्ण करण्याच्या सुचना आपल्या स्तरावरुन देऊन सर्व अभ्यासक्रमाचे निकाल विहित मुदतीमध्ये जाहिर करण्यासंदर्भात प्रस्तुत विदयापीठास सहकार्य करावे. अन्यथा उपरोक्त ठरावानुसार संबंधीत महाविदयालयावर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ.म.स.रोकडे)
प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/मध्यवर्ती मूल्यमापन विभाग/2766 दि.- 1 DEC 2023